महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecommho@gmail.com

**क्र.पी-कॉम/मु.अ.(वा)/लेखा/६५०१** **दिनांक :०६/०३/२०१९.**

# वाणिज्य परिपत्रक क्र.३१४

**विषय: राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना वीज दरात सवलत देण्याबाबत.**

**संदर्भ:** शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३८२/ऊर्जा-५ दि.३१.०१.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन राज्य शासनाकडून कृषी ग्राहकांना वीज दर सवलत देण्यात येते. त्यापोटी होणाऱ्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी शासनाकडून प्रति युनीट देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम ठेवण्यात आली होती. शासन निर्देशानुसार ऑगस्ट -२०१२ नंतर वीज दरात होणारी वाढ कृषीपंपधारकांनी भरावयाची आहे व त्यानंतर वीज दरात होणाऱ्या वाढीचा भार ग्राहकांच्या वीज देयकात आकारणी करण्यात येत आहे.

राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन सहकारी ग्राहकांचा माहे नोव्हेबर -२०१६ पर्यंत शासन सवलतीचा वीज दर रु.१.१६ प्रति युनीट कायम होता. उच्चदाब उपसा जलसिंचन सहकारी संस्थांद्वारे शासनाकडे माहे नोव्हेंबर २०१६ पासून मार्च २०२० पर्यंतचे वीज देयकात मा. आयोगाच्या आदेशानुसार होणारी वाढ लागू न करता रु.१.१६ प्रति दराने आकारणी करण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आली होती. सदर बाब ही शासनाच्या विचाराधीन होती.

सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने शासन निर्णय दि.३१.०१.२०१९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:**

१) राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना रु.१.१६ प्रति युनीट हा सवलतीचा वीज दर दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ ते मार्च, २०२० पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. यापोटी महावितरण कंपनीवर पडणाऱ्या आर्थिकभाराची प्रतिपुर्ती अंदाजे रु.१०७.७३ कोटी शासनामार्फत अर्थसहाय्याच्या स्वरुपात महावितरण कंपनीस मान्यता देण्यात देत आहे.

२) मार्च २०२० नंतर सदर सवलतीबाबत ऊर्जा विभागामार्फत आढावा घेण्यात येईल.

३) उपरोक्त निर्णयानुसार महावितरण कंपनीने कार्यवाही करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

**वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.**

१) शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना रु.१.१६ प्रति युनीट हा सवलतीचा वीज दर माहे फेब्रुवारी -२०१९ (जानेवारी -२०१९ च्या वीज वापर) पासून मार्च -२०२० पर्यंत लागू करणे.

२) पुर्व कालावधीच्या आर्थिकभाराच्या रक्कमेच्या फरकाची रक्कम दि.०१.०४.२०१९ पासून समान सहा मासिक हप्त्यात ग्राहकाच्या येणाऱ्या वीज देयकातून समायोजीत करण्यात येईल.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी माहे जानेवारी -२०१९ च्या वीज वापरापासून करण्यात यावी.

हे परिपत्रक, महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सहप्रत:** परिशिष्ट 'अ'

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रति,**

**संगणक प्रणाली विभाग**

--- पुर्व कालावधीच्या सवलतीच्या वीज दराच्या फरकापोटी (दि.०१.११.२०१६ ते डिसेंबर-२०१८ पर्यंत) येणाऱ्या आर्थिकभाराची परिगणना संगणक प्रणालीमार्फत करण्यात यावी. जेणेकरुन आर्थिक भाराची पुरवणी मागणी शासनास सादर करण्यात येईल.

राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना वीज दरात सवलत देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र. ३८२ /ऊर्जा-५**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ३१ जानेवारी, २०१९.

**प्रस्तावना :-**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ११.१०.२०१२ नुसार राज्य शासनाकडून कृषीग्राहकांना वीजदरात सवलत देण्यात येते. त्यापोटी होणाऱ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाकडून प्रति युनिट देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम ठेवण्यात आली होती. त्यानुसार ऑगस्ट, २०१२ नंतर वीजदरात होणारी वाढ कृषीपंपधारकांनी भरावयाची आहे. त्यामुळे त्यानंतर वीजदरात होणाऱ्या वाढीचा भार ग्राहकांकडून वसूल करण्यात येत आहे.

२. ऑगस्ट, २०१२ पासून उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना वीजदर सवलत देण्याकरिता रुपये २.१६ प्रति युनिट शासनामार्फत महावितरण कंपनीस अनुदान देण्यात येते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीच्या ग्राहकांसाठी जून-२०१५, नोव्हेंबर-२०१६, एप्रिल-२०१७, एप्रिल-२०१८ व सप्टेंबर-२०१८ मध्ये नवीन वीजदर आदेश लागू केले आहेत. सदर वीजदर आदेशानुसार उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांच्या वीजदरात वाढ झाली. दिनांक २६.०६.२०१५ च्या वीजदर आदेशानूसार उच्चदाब उपसा जलसिंचन ग्राहकाने भरावयाचा वीजदर हा रुपये १.१६ प्रति युनिट इतका होता. याच दराने नोव्हेंबर, २०१६ पासून मार्च, २०२० पर्यंत वीज देयके देण्याबाबत राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन सहकारी संस्थांची मागणी होती. याबाबतचा प्रस्ताव दिनांक २९.०१.२०१९ च्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यावर मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. राज्यातील उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना रुपये १.१६ प्रती युनिट हा सवलतीचा वीजदर दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ ते मार्च, २०२० पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. यापोटी महावितरण कंपनीवर पडणाऱ्या आर्थिकभाराची प्रतिपूती अंदाजे रुपये १०७.७३ कोटी शासनामार्फत अर्थसहाय्याच्या स्वरुपात महावितरण कंपनीस देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. मार्च, २०२० नंतर सदर सवलतीबाबत ऊर्जा विभागामार्फत आढावा घेण्यात येईल.

३. उपरोक्त निर्णयानुसार महावितरण कंपनीने कार्यवाही करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र. २६/१९/व्यय-१६ दिनांक ३१.०१.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०१३११५५६४२२४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( भि. य.मंता )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत:**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) सर्व मंत्रालयीन विभाग
९) सचिव,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १, १३वा मजला, कफ परेड, मुंबई ०५.
१०) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
१२) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१५) अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) कक्ष अधिकारी (१४६१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.